मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.
बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक-सीसीएफ-२०१६/प्र.क्र. ९६/२०१६/२५
मुख्य इमारत, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीडीसी-१०६९-१३५१४-बी, दि. २७/०८/१९६९
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीडीसी-१०६९/१३५१४-बी, दि. ०८/१०/१९७०
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीसीएफ-२०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५ दि.४/३/२०१७
४) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीसीएफ-२०१४/प्र.क्र.८८/२०१४/२५ दि.२७/९/२०१७
५) शासन निर्णय क्रमांक-सीसीएफ-२०१६/प्र.क्र. ९६/२०१६/२५, दि.२.८.२०१९

प्रस्तावना :

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीचे भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई येथे स्वीय प्रपंजी लेखा खाते आहे. सदर खात्यामधून बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या संस्थेस शासन निर्णय क्रमांक-सीसीएफ-२०१६/प्र.क्र. ९६/२०१६/२५, दि.२.८.२०१९ अन्वये रुपये ५.०० लक्ष (रुपये पाच लक्ष फक्त) इतके अर्थसहाय्य मंजूर करून संस्थेच्या रयत सेवक को-ऑप.बँक लि. सातारा, शाखा कोल्हापूर, खाते क्र. ०३ या खात्यामध्ये जमा करण्यात आले होते. मात्र संस्थेने दिलेला बँक खाते क्रमांक चुकीचा असल्याने सदर रक्कम संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा होऊ शकली नाही. त्यानंतर संस्थेकडून संस्थेच्या बँक खात्याचा सुधारित तपशील प्राप्त झाल्यानंतर सदर खात्यामध्ये मंजूर रुपये ५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य जमा करण्यासाठी, संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून, सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय -

मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीचे संपूर्ण नियंत्रण, व्यवस्थापन व प्रशासन मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे निहीत आहे. मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीमधून महाराष्ट्र राज्यातील किंवा राज्याबाहेरील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धर्मादाय किंवा तत्सम सार्वजनिक किंवा निम सार्वजनिक संस्था किंवा संघटना यांना, या निधीतून मा.मुख्यमंत्री यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार अर्थसहाय्य देण्यात येते. त्यानुसार बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या संस्थेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी रुपये ५.०० लक्ष इतक्या अर्थसहाय्यास मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरून बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या संस्थेस रुपये ५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) इतके अर्थसहाय्य याद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

२. बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या संस्थेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. संस्थेस ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी सदर निधी संस्थेने एका वर्षात खर्च करावा आणि खर्चाच्या अनुषंगाने “सनदी लेखापाल” (Chartered Accountant) यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र व बाबनिहाय खर्चाचा तपशील निधी प्राप्त झाल्यानंतर एक वर्षात सादर करावा. तसेच सदर संस्थेने नियमानुसार लेखापरिक्षण करुन घेऊन लेखापरिक्षण अहवाल देखील शासनास सादर करावा.

३. सदर निधी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०१०/प्र.क्र.६८/कोषा प्र-५, दि.१८ एप्रिल, २०११ मधील तरतुदीस अनुसरुन मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीच्या स्वीयप्रपंजी (PLA) लेखा खात्यामधून बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, जि.कोल्हापूर या संस्थेच्या रयत सेवक को-ऑप.बँक लि. सातारा शाखा कोल्हापूर खाते क्र.०१८०३६०००००३ मध्ये विहीत कार्यपद्धतीनुसार जमा करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय संदर्भाधीन दि. २७/०८/१९६९, दि ८/१०/१९७०, व दि.४/३/२०१७ च्या शासन निर्णयातील व दि.२७.९.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या मंजूरी नंतर निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८२८१०४९१४५६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujjwala Vinayak Pharande

Digitally signed by Ujjwala Vinayak Pharande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7598aba6fcd2935da29ab3c2b3156a82e243b7c8f01aeade5ee81d21f19e8315, serialNumber=70bde76ab0df1e2787a27ac7b7a7f156f938de5b9bab0b9c4f943cf57a2d2cc7, cn=Ujjwala Vinayak Pharande
Date: 2019.08.28 11:30:26 +05'30'

(उ. वि. फरांदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) महालेखापाल, महाराष्ट्र (१/२), लेखा व अनुज्ञेयता, मुंबई / नागपूर
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
५) निवासी लेखाधिकारी, मुंबई,
६) उप सचिव (कोषा प्र-५/ अर्थ-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वसंत प्लाझा, १०७९/ख, तिसरा मजला, बागल चौक, राजाराम रोड, जि.कोल्हापूर-४१६००५
८) अध्यक्ष, बुगडीकट्टी शिक्षण प्रसारक मंडळ, बुगडीकट्टी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर
९) निवडनस्ती (का-२५)